

श्री दिगंबरपंत रवळेकर (काका)
यांच्या स्मरणार्थ



# श्री पंत गुरुचरित्र

५२ श्लोकी

।। ॐ नमः शिवाय ।।

## श्रीगुरुदेवदत्त

**मंगलाचरण**



काषायवस्त्रं करदण्ड धारिणम् । कमंडलुं पद्म करेण शंखम् ।।
चक्रं गदा भूषित भुषणाढ्यम । श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ।।
ब्रम्हानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तीम् । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् ।।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतम् । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरूं तन्नमामि ।।

ध्यायेत् श्रीपंतराजं गुरूवरमतुलं श्यामलं भव्यभालम् ।
गंभीर कुंकुमाढयं सितशुभवसनं मुक्तकेशं परेशम् ।।
शांत व्याघ्राजिनस्थं करघृतवरसद्बोधदण्डं महान्तम् ।
मुक्तारुद्राक्षहारं सरसिजनयनं दिव्यगात्रं पवित्रम् ।।

सुंदर ते ध्यान औदुंबरातळी । पावन कर्दळीपुरी शोभे ।। १ ।।
शोभती कुंतल मुक्तकेश शिरीं । तेवी स्कंधावरी दोही भागी ।। २ ।।
भाग्यवंत तेची श्रीमुख पाहती । नभी निशापति लाजिन्नला ।। ३ ।।
लावियेला टिळा भाळी कुंकुमाचा । पूर तो प्रेमाचा नेत्री दिसे ।। ४ ।।
दिसे किती शांत ती गंभीर । दिव्यश्वेतांबर शोभा अंगी ।। ५ ।।
अंगाची ठेवण अनुपम किती । बोधदंड हाती माळ गळा ।। ६ ।।
गळे अहंकृति पाहता ही मूर्ती । जीवासी विश्रांती होय येथे ।। ७ ।।
येथे गुरुदत्त अनुसयात्मज | पंतमहाराजरूपी वसे ।। ८ ।।
वसे दिगंबर दास रक्षणार्थ । भक्तमनोरथ पुरवाया ।। ९ ।।



श्रीपंत परिवार

।। श्री पंत समर्थ ।।

श्रीपंतगुरुचरित्र प्रारंभ

जय जय जय हा नाद कोंदला ।
नरसिंहाच्या तपोबलाने अवनितली आला ।।
निर्गुण असून सगुण होऊनि अजापुरि जन्मला ।
पंतप्रभू तो परब्रम्हची उद्धरण्या आला ।। १ ।।

भगीरथाने जी गंगा आणली स्वर्गातून भूवरी ।
प्रवाह तिचा वाहे कर्दळीपुरी ।।
युगा युगांतरी पवित्र ठरले ऐसे हे क्षेत्र ।
दावित लीला इथे वाढतो रामाचा पुत्र ।। २ ।।

अजापूरी मग जाई शिक्षणा सवंगडी जमती ।
पाहुनी लीला ऐकुनी बोधा विस्मित ते होती ।।
बुडालेला पती आणुनी देता धन्यची होय सती ।
दत्तची हा, हा नाही मानव खूण बाणली चित्ती ।। ३ ।।

वेणूपुरासी निघे जावया जगदोद्धार कराया ।
तधी सैंगडी घेरुनी त्यासी लागती स्फुंदाया ।।
निर्गुण दाखवुनी लपविसी सगुणा नको आम्हा परि ते ।
गहिवर दाटुनि पंत बोलती स्मरता मी येथे ।। ४ ।।

बालमुकुंद महिमा जाणुनी अर्पी सर्वस्वाते ।
पुत्र हाच जो चालवील अवधूत वंशाते ।।
जाणुनी गुरूवर देती बोध 'तूचि अनादि अनंत ।
जन्म मरणाविरहित तु रे तूची अवधूत' ।। ५ ।।

प्रेम वाढले ओढ लागुनी परस्परा भेटती ।
अवचित येउनी यात्रे जातो श्रीशैला म्हणती ।।
सांत्वन करुनी त्यासी सांगी वाढवी संप्रदाय ।
दत्तप्रभू हा माना याते भक्ता सांगुनी जाय ।। ६ ।।

गुरुआज्ञेसी वर्तुनी चालवी संप्रदाय पीठा |
ज्ञानामृत पाजिता अज्ञही भजनी डुंबती देखा ||
सुशील कन्या यमुना वरुनी प्रपंच साधीतसे |
नाना मत नी संप्रदाय ते विकल्प फेडितसे || ७ ||

अक्कोळचे ते विष्णूअण्णा फिरती इथे तिथे ।
शांती मिळेना अंती पातले श्रीपंतगृही ते ।।
कृपा लाभता मिळे शांतता नातेही जडले ।
आपुल्या ग्रामी शुद्ध प्रेमे पंतासी ओढीले ।। ८ ।।

दत्तजयंती उत्सवी रमण्या विष्णूअण्णा जाती ।
प्रेमसागरी प्रेमभोवरी डुंबत ते राहती ।।
बंधू माता सुवासिनी नी सारे गुरुगृहीचे ।
वर्षती प्रेमा तधी हरपले भानची देहाचे ।। ९ ।।

नऊ भोवरे पार करुनी गाठावा तो तळ ।
जिथे विराजे भक्तमंडळी स्वरूप ते उज्ज्वल ।।
प्रेमामृत ते कर्णी पडता धन्य धन्य झाला ।
नवविध भक्तीच्या माहेरी पुष्टी तो पावला ।। १० ।।

बाळकृष्ण पितामह प्रभूचे संन्यासा वांच्छिती ।
धार्मिक विधी सकल संपता दिक्षा द्या म्हणती ।।
कोणी न धजती, विप्राज्ञेने प्रभू दे दिक्षेला ।
कृतार्थ होऊनी पितामहे मग त्यजिले देहाला ।। ११ ।।

व्यंकटरावा निद्रेमाजी वेणुपुरा आणले ।
अपुऱ्या अन्ना वस्त्र झाकुनी सकलासी पुरविले ।।
लीला दावीत बिंबवी चित्ती नामाचा महिमा ।
तारक तेची कलियुगी या जपतप याग ना कामा ।। १२ ।।

नवरात्राचे महात्म्य सांगी व्यंकटरावाते ।
महामारीतून वाचवी लीले त्याच्या पत्नीते ।।
दंडाऐवजी अधिकार देऊनी बोधी तया लागून ।
सुखदुःखा विरहित होऊनी रहावे गुरुपदी लीन ।। १३ ।।

पाहुनी भक्ती हणमंताची प्रेमे सर्जा म्हणती ।
डोही पडता सकल भक्त ते सुखरूप त्या आणिती ।।
"अग्नीमधून वत्स सोडवी सर्जा" आज्ञापिती ।
गुरुआज्ञेचे पालन करणे श्रेष्ठधर्म दाविती ।। १४ ।।

पंचबंधूंसह सहा रूपे ती सर्वस्वी रक्षिती |
भक्त खरा तो भाव जयाचा विश्वी त्या पाहती ||
अनन्यभावा देखूनी करिती स्फोटक निवारण |
गुरुलीला ही तारून नेते संकट जरी दारुण || १५ ||

करुणालाप पडता श्रवणी विठूस आलिंगती |
तशीच कृपा जगदंबेच्या भक्तावारी करिती ||
रूप दावूनी जगदंबेचे ऐक्य तया दाविती |
समाधीसुखाचा परमानंद अनुभवमंडपी देती || १६ ||.

मंत्रामध्ये तेज आगळे तारकमंत्राचे |
गुरूमुखातून हृदयी शिरता दर्शन स्वरूपाचे ||
त्या सामर्थ्ये मुक्ती पिशाच्चा गुरुमाउली देई |
अनन्य भक्ता ज्वरे ग्रासिता व्याधी निरसुनी जाई || १७ ||

संतु गुरव दीन परी त्या तीव्र ओढ गुरुची |
स्कंधी नेता जलापार त्या आस पुरली मनीची ||
सेवा ध्यान नाम भक्तीने भवसागर तरु दे |
हरुनी संकटा उत्सवी आणुनी म्हणे शिंग वाजुदे || १८ ||

तळमळ चित्ती वृक्षावरुनी राणोजी पडला |
भस्म लावुनी मंत्र सांगुनी सावध त्या केला ||
विठू महारासे गुरूने तयाला कर्जमुक्त केले |
प्रपंची आणि परमार्थीही भक्ता तारियाले || १९ ||

देव सोडूनी पुजिती मानव निंदे रंगोपंत |
चेष्टा करता ‘दत्त दत्त’ तो पापे गिळूनि जात ||
गुरुनाम ते पावन ऐसे निंदेस्तव जरी गाती |
तारक होऊनी भक्तअभक्ता देई एकची गती || २० ||

अनुतापाने सोडी नोकरी कृष्णा रत चरणा |
भक्तिभावे अंतरी साठवी पंत योगीरमणा ||
गुरुबंधू परी बळी ज्ञानाचे वधावया जाती |
क्षमा करुनी पंत तयांना वाढवी अंतरी भक्ती || २१ ||

भक्तिभावे चरणी पडता सद्गुरू उद्धरितो |
भाव पाहुनी गणपतराव स्वयंज्योती दावितो ||
अभिमानाने परि तयाला नाडिले विसरी सद्गुरूला |
संकटी पडता वर्म उमजुनी कृपाछत्र पावला || २२ ||

तरंग रूपे भेट घडतसे महिमा प्रेमाचा |
समाधीत भक्तास नेऊनी नाशी भ्रम योगाचा ||
दत्त पंत हे नाहीत भिन्न पाहुनी व्यंका तृप्त |
अभिमानाने हानी होते पटवी सद्गुरू पंत || २३ ||

सिद्धारूढ मठी जाई भेटण्या स्कंधी तये घेतले |
खूण बाणता परस्पराते प्रेमे मग पूजिले ||
कल्लेश्वर मंदिरात देई पंतप्रभू दर्शन |
विभूतीमहिमा पटवी सकला व्याधीते नाशून || २४ ||

सत्संगाने गुरु भेटतो बोधे संशय विरतो |
स्वयंभू वस्तू तोचि आत्मा विश्वी विश्वंभर तो ||
सुखदुःखादी निव्वळ माया अहंकार तनया |
त्यासी त्यागिता स्थिती विदेह मिळवी सायोज्या || २५ ||

प्रेमळ उदार प्रसन्न सद्गुरू न मागताही देई |
लीन होऊनी अभिमान सोडूनी चरणी रत जो होई ||
दावी सद्गुरू सकल ठिकाणी नको तीर्थ भ्रमण |
अनन्य भक्ता भेटवी भगिनी करी तिज प्रभुपदी विलीन || २६ ||

गुरुकृपेहून व्यर्थचि सारे भजन योग साधन |
पतिव्रता धर्माची महती करिती विठीला कथन ||
संकटसमयी तारी बुडता भावभक्ती पाहून |
प्राप्तघडी ही म्हणून घ्याहो गुरुकृपे साधून || २७ ||

गुरुपदी होता लीन उडतसे भाव साक्षित्वाचा |
जिव-शिव ऐक्या दावी अर्पिता काया मन वाचा ||
निर्वाणीचा सखा सद्गुरू मायिक सर्वही जाण |
मुतालिक सोडवी काननी तस्कर हातातून || २८ ||

प्रेमानंदी ॐकार स्फुरण नमः म्हणता शिवि विलीन |
मंत्रार्था या सांगुनी दावी दत्तस्वरूप खूण ||
समर्थ तोचि तो सर्वज्ञ जाणी समतत्वा |
नमन जगादी बोधुनी विवरे कृपाप्रसादत्वा || २९ ||

शिवरात्रीची फोड करोनी भक्तिप्रेमा गाई |
कर्मे नाही देहशुद्धी आत्मा मुक्तिचि पाही ||
बोधुनी ऐसे निक्षुनि सांगे ना रम गुरुपरीक्षी |
बाहे गुरुसी रानी तयाला गुरु सर्वसाक्षी || ३० ||

गूज सांगती क्षत्रियांचे कोट गुरुबोध |
रक्षण करुनी नामशराने मिळवा स्वानंद ||
भिमरावासी राखी संकटी पळती दायाद |
त्रिशूल फेटा गुरूचा तारी निकरी प्रसाद || ३१ ||

सामंतासी देई अनुग्रह कृपाकवच ल्याला |
दरबारीचा सरदार होऊनी स्वानंदी रमला ||
कर्तव्याते नित जागावे आत्म्याला तृप्ती |
भगिनीच्या तव अनंतरावा निक्षुनिया सांगती || ३२ ||

रिसा आलिंगी विश्वी भरला विश्वंभर सत्य |
म्हणून बाहे अवधूत नामे राघवेंद्रा पंत ||
कृष्णासाठी होई नोकर वैजनाथी रमतो |
चिदंबराते सांगे भजण्या कलियुगी दत्तप्रभू तो || ३३ ||

बसवंतासी बोधुनी सांगे घातकरे 'मी'पण |
त्यागुनी त्याते 'तू'पण धरुनी घ्यावे गुरुचरण ||
उडी घेऊनी खड्ड्यामाजी भक्त पटविती लोका |
गुरुआज्ञेच्या नसे पालनी कसलाही धोका || ३४ ||

कर्मठ वृत्ती विष्णुपंत रमे अनुष्ठानी |
खूण दावूनी दर्शन दिधले तरि रत तीर्थाटनी ||
व्याधीग्रस्त होता सांगे नको आत्मद्रोह |
चरणी पडता देई पादुका निरसुनी जाई मोह || ३५ ||

आज्ञापालनी असे गुरुकृपा तेच असे सोवळे |
सद्भावाने भक्तासंगे काला करुनी खेळे ||
विप्रधर्म तो सांगी पिशाच्च्या देई तया मुक्ती |
आशीर्वचने पतिव्रता मग भोगे जीवन तृप्ती || ३६ ||

दश आज्ञा त्या घालुनी देई पाळा प्राणपणाने |
बोधुनी विवरे पंचवर्ग ते गुरुपुत्र लक्षणे ||
बाळे अर्पिता दिव्य पादुका ल्याला जगज्जीवन |
उत्सवसमयी मोदे मिरविती भक्त तया अजून || ३७ ||

संध्येसमयी अर्ध्य द्यावे गुरुसी जो सविता |
गायत्री तो तारकमंत्र भवसागरी तारिता ||
सत्संगतीने सहज समाधी पोचवी पूर्णस्थितीला |
वामनराव दृढ धरी बोधा उद्धरी पितयाला || ३८ ||

शुद्ध मनाने शिवभेटीसी जाणे आत्म्याचे |
गणेशभक्ती तीच जाणीजे ऐक्यचि गुरुशिष्याचे ||
सांगी कसोनी कुलधर्म पाळण्या गुरु अंबा ना भिन्न |
ध्यास मनाला सदा लागण्या मूर्तिपूजा जाण || ३९ ||

स्वप्नी दाविता ऐक्यभावा शिवशक्तीरूप |
तोचि सद्गुरू कृपा मिळवूनी व्हावे प्रेमस्वरूप ||
शांती विवेक धैर्यादी ही गुरुपुत्र लक्षणे |
नरदेहाचे सार्थक करण्या गुरु-कास धरणे || ४० ||

गुरुची देणगी शांती श्रेष्ठ सर्वस्वे रक्षावि |
नागरकट्टी ऐकुनी भावे गुरुकृपा मिळवी ||
‘अल्लख’ वचन श्रवणी पडता धाव तिथे घ्यावी |
बोधी पंत आज्ञा गुरुची कधी नच उल्लंघावी || ४१ ||

पंत सांगती नागरकट्टीस सामोरी बसवून |
निर्मन होऊनी गुरुपदी पडणे तेची अखंड नमन ||
जप तप कर्मे विफलची सारी गुरुकृपा मिळवा |
दिव्य दृष्टीने देखा अंतरी चैतन्याचा ठेवा || ४२ ||

अशाश्वताते घेऊनी देई गुरुकृपा शाश्वत |
सोज्वल मंगल सर्वश्रेष्ठ मार्ग एक अवधूत ||
शांती मिळवण्या व्हावे आपण गुरुघरचे श्वान |
भक्तीसाठी अखंड प्रिती गुरुमूर्ती सगुण || ४३ ||

पाप कर्दमी राम शिपाई उद्धरी कृपे करोनी |
रामानंद होऊनी करविरी पसरी भक्ती जनी ||
नंदादीपा जला ओतिले स्नेह परी झाले |
भक्त महिमा असा वाढवूनि मूढ जना तारिले || ४४ ||

लिंगायत शब्दा विवरूनी दावी अर्थ सुबोध |
परब्रम्ह तो जंगम जाण तीर्थ गुरुबोध ||
प्रसाद तो तर बोधप्रचिती भस्म शुद्ध चित्त |
ऐसा होई लिंगायत मग पावसी स्वरुपाप्रत || ४५ ||

दत्तभजनी रमे गोपाळ दक्ष प्रजापालनी |
स्मरता बंधूस पंत धावती भेटती आलिंगुनी ||
परतत असता भक्ता भेटुनी मनोरथा पुरवितो |
कडोलीला आशीससामर्थ्ये सुत भगिनीला देती || ४६ ||

राधा म्हणजे प्रकृतिमाया भुलला जिव गोपाल |
अनंत योनी दुःखी फिरणे हित कैसे साधाल ||
बोध ऐकता तल्लीन सारे बाहे नारायणा |
स्वप्नखूणेने पटवून दिधले नाही मी-तूपणा || ४७ ||

लीला दावूनी सांगती अन्न निषिद्ध ते कोणते |
गोपाळाते वाचवी विभूती दावी तेजरूपाते ||
अज्ञकुमारा वरदान देऊनी नाशी दैन्य अविद्या |
महिमा वाढवी नामाचा मिळवी चिरसौख्या || ४८ ||

बोधी सांगे गणपतरावा तनु ही अशाश्वत |
जन्ममरण ते आत्म्या नाही गुरुचरण शाश्वत ||
निरसुनीऐसे भवबंधाते देई विभूती तया |
मुखी घालता खडबडूनी ती उठे तयाची जाया || ४९ ||

स्वयंब्रम्ह हा आत्मा असुनी जिव भाव मिथ्या |
प्रपंच तो तर जाणी स्वप्न सोडी कल्पित माया ||
उभवशील रे तू त्रैलोक्यी ध्वज मम नामाचा |
तसेच घडुनी मोरोबा हो पुतळा शांतीचा || ५० ||

बोलावूनी कांतेस सांगती कार्य झाले पूर्ण |
अवताराची करू समाप्ती लौकिक देहा त्यजून ||
आदीशक्तीस सांगुनी ऐसे भक्ता बोधिती पंत |
कर्दळीपुरी वास नित्य मम, पावती अंतर्धान || ५१ ||

कार्य संपता कांतेसह ते संपविती अवतार |
भक्तवृंद मंदिर उभवूनी गर्जती जयजयकार ||
प्रकट झाहला त्याच ठिकाणी औदुंबर व्रुक्ष |
श्रीपंतपादुका आजही तेथे देती भक्ता साक्ष || ५२ ||

**|| श्री पंतगुरुचरित्र समाप्त ||**

लेखिका श्रीमती सरल कारेकर



बाळेकुंद्री मठ, बेळगाव.